ePaper

| वर्ष - 6 | अंक - 357 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार दि. 17 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## महाराष्ट्र भूषण कार्यक्रमात मृत्यूचे तांडव; उष्माघाताने घेतला 11 जणांचा बळी



### आतील पानांत


- पुरंदरसाठी शिवतारे यांची साखर पेरणी?
- हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोला गती!
- महाविकास आघाडीची वज्रमूठ!
- भाजपाला धक्क्यावर धक्के!


# एच.ए. मैदानावर ‘वज्रमूठ’!

## महाविकास आघाडीची तयारी : सावरकर गौरव यात्रेला तोडीस तोड सभा होणार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाविकास आघाडीच्या माध्यमातून राज्यातील विरोधी पक्षांची एकजूट करुन भाजपाला आव्हान देण्यासाठी राज्यात ठिकठिकाणी ‘वज्रमूठ सभा’चे आयोजन करण्यात आले आहे. नागपूर येथील यशस्वी सभेनंतर आता पुणे जिल्ह्यातील सभा पिंपरी-चिंचवडमधील एच. ए. मैदानावर होणार आहे. त्यासाठी स्थानिक आणि राज्य पातळीवरील महाविकास आघाडीच्या नेत्यांची तयारी सुरू झाली आहे.**



पिंपरी-चिंचवड शहर हा राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार आणि राष्ट्रवादीचे प्रभावक्षेत्र म्हणून ओळखले जाते. त्यामुळे राष्ट्रवादीच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांवर वज्रमूठ सभा यशस्वी करण्याची जबाबदारी सोपवली आहे. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ही सभा होणार असून, संपूर्ण पुणे जिल्ह्यातील लक्षवेधी सभा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्याद्वारे भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना महायुतीसमोर आव्हान निर्माण करण्यात आहे, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली.

विशेष म्हणजे, पुणे जिल्ह्यातील सभेला स्वतः राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यासह माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, विरोधी पक्षनेते अजित पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख दिग्गज नेते उपस्थित राहणार आहेत.

याबाबत अधिकृत घोषणा आठवडाभरात करण्यात येईल, असेही समजले. काही दिवसांपूर्वी शहरात भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना महायुती तसेच हिंदुत्ववादी संघटनांच्या पुढाकाराने सावरकर गौरव यात्रा काढण्यात आली.

या यात्रेमुळे शहरात भाजपाने वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न केला. आता महाविकास आघाडी मोठ्या प्रमाणात शक्तीप्रदर्शन करण्याच्या तयारीत आहे.

### सभेची जबाबदारी कोणावर?

» स्थानिक पातळीवर राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, निवडणूक प्रभारी योगेश बहल यांच्यासह काँग्रेसचे शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्यासह शिवसेना ठाकरे गटाचे शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले यांच्यावर जबाबदारी सभेच्या तयारीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. वास्तविक, योगेश बहल, कैलास कदम आणि राहुल भोसले यांच्या प्रभागात एच.ए. मैदान असल्यामुळे या तीघांवर मोठी जबाबदारी आहे. तसेच, राज्यातील महाविकास आघाडीचे पक्षश्रेष्ठी नियोजनाबाबत सतर्क आहेत. मात्र, अद्याप कोणत्याही पदाधिकाऱ्याने अधिकृत दुजोरा दिलेला नाही.



### एच.ए. मैदानासाठी यासाठी केली निवड?

» पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. तसेच ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांना पिंपरीत येणे सोईचे आहे. चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत महाविकास आघाडीने चांगले ‘प्लॅनिंग’ केले होते. पिंपरी विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे. भोसरीला लागून असलेल्या या मैदानावर गर्दी जमवणे सोपे होणार आहे. मावळातील कार्यकर्त्यांना पुण्यापेक्षा पिंपरीत येणे सुलभ होणार आहे. विशेष म्हणजे, एच. ए. मैदानावरच शेवटची राजकीय सभा भाजपाकडून करण्यात आली होती. त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी या सभेला उपस्थित होते. त्यानंतर या मैदानावर राजकीय सभा झालेली नाही. तसेच वंचित बहुजन आघाडीचीही सभा या ठिकाणीच झाली होती. त्यामुळे एच. ए. मैदानावर सभा घेवून भाजपा- शिवसेना महायुतीसमोर शक्तीप्रदर्शन करता येईल, असा कयास महाविकास आघाडीच्या नेत्यांचा आहे.

# ‘पीएमपीएमएल’ची आता ऑनलाईन तिकिट सुविधा

## प्रवाशांच्या सोयीचा विचार : ॲप विकसित करण्याचे काम प्रगतीपथावर

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (पीएमपीएमएल) ने जाहीर केले आहे की ते एका ॲपद्वारे ऑनलाइन तिकिटे जारी करणार आहेत. जे सध्या विकसित होत आहे. ॲप पूर्ण झाल्यानंतर पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील रहिवासी पीएमपीएमएलच्या ॲपद्वारे ऑनलाइन पेमेंट करू शकतील, तिकीट खरेदी करू शकतील आणि मार्गाची माहितीही मिळवू शकतील.**

डिजिटल इंडिया मोहिमेच्या अनुषंगाने, पीएमपीएमएल प्रशासनाने आपल्या ग्राहकांना ऑनलाइन सेवा देण्यासाठी पावले उचलली आहेत. अलीकडेच PMPML ने जाहीर केले की ते ऑनलाइन पेमेंट ॲपद्वारे तिकिट देयके स्वीकारत आहेत, ज्याची चाचणी दोन पुणे दर्शन बसमध्ये प्रायोगिक तत्त्वावर केली जाईल. यशस्वी झाल्यास अन्य बसेसमध्ये ही सुविधा सुरू करण्यात येईल. याव्यतिरिक्त, विविध सेवा ऑनलाइन



देण्यासाठी पीएमपीएमएल वेबसाइट अपडेट केली जाईल. इंटेलिजेंट ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टीम (ITMS) सुविधा सुरू करण्यासाठी प्रशासनाने GOOGLE सोबत करारही केला आहे, ज्यामुळे नागरिकांना बसेसचे थेट स्थान ट्रॅक करता येईल आणि मार्ग आणि वेळेची माहिती ऑनलाइन मिळू शकेल.

### प्रवाशांना होणार फायदा...

» डिजिटल सेवा सुरू झाल्यामुळे पुणे व पिंपरी-चिंचवडकरांना मोठा फायदा होईल आणि पीएमपीएमएलच्या कामकाजात सुधारणा होईल. तथापि, या सेवांच्या अंमलबजावणीला कर्मचारी संघटनांचा विरोध होता आणि नियोजनातील विलंब यांचा सामना करावा लागला, ज्यामुळे डिजिटायझेशनच्या प्रयत्नांना अडथळा निर्माण झाला होता.मात्र, प्रशासनाने हे काम आता ‘फास्ट ट्रॅक’वर हाती घेतले आहे.

# पुरंदरसाठी शिवतारे यांची साखर पेरणी?

## अजित पवार यांच्या माध्यमातून पुरंदरची निवडणूक सोपे करण्याचे प्रयत्न

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पुरंदरचे माजी आमदार विजय शिवतारे यांना पुरंदरमध्ये निवडणुकीत पराभूत केल्याचे मानले जाते. तेव्हापासून शिवतारे हे पवार कुटुंबीयांवर नेहमीच आग पाखड करताना दिसून येत आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून अजित पवार हे अस्वस्थ असून लवकरच ते दुसऱ्या पक्षात प्रवेश करणार अशा चर्चांना उधाण आले आहे. त्यातच शिंदे गटात दाखल झालेले विजय शिवतारे यांनी यावर आता अजित पवार यांना शिंदेच्या शिवसेनेत येण्याची ऑफरच दिली आहे. मात्र यातून वेगळ्या चर्चांना देखील उधाण आले आहे. विजय शिवतारे हे अजित पवार यांच्या माध्यमातून आपली साखर पेरणी तर करत नाहीत ना?, अशा चर्चा आता सुरू झाल्या आहेत.**



पुरंदर तालुक्यामध्ये राजकारणाला सुरुवात केल्यानंतर पुरंदरचे माजी आमदार राज्याचे माजी मंत्री विजय शिवतारे यांनी पवारांना विरोध आणि पवारांवर जाहीर टीका हे राजकारणाचे सूत्र अवलंबल्याचे आपण नेहमीच पाहतो. पवारांनी पुरंदरचा विकास केला नाही असं म्हणत त्यांनी नेहमीच पुरंदरची तुलना बारामती केली. बारामतीतील रस्ते, बारामतीतील शिक्षण संस्था, बारामतीत झालेली बागायत शेती, बागायतीमध्ये असलेल्या वैद्यकीय सुविधा याची तुलना विजय शिवतरे हे नेहमीच करत राहिले. दहा वर्ष सत्तेत राहिल्यानंतर बारामतीच्या अजित पवारांनी विजय शिवतरे यांना कात्रजचा घाट दाखवला.

लोकसभा निवडणुकीमध्ये विजय शिवतरे यांनी अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्यावर जहरी टीका केली. शरद पवारांना तर "बहलोल खानाची" उपमा देखील त्यांनी दिली आणि याचाच राग मनात धरूनअजित पवार यांनी विजय शिवतरे यांना 'आता कसा आमदार होतो तेच पाहतो;, असे म्हणत चारी मुंड्या चीत केले. त्यावेळी अजित पवार यांनी विजय शिवतरे यांचा पराभव अजित पवार यांनी सहज केला. त्यामुळे मागील अडीच वर्षात विजय शिवतरे यांना सक्रिय राजकारणापासून दूर राहावे लागले.

मात्र भाजप आणि शिंदेचे सरकार आल्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा उचल खाल्ली आणि बारामती लोकसभा मतदारसंघांमध्ये पवार कुटुंबीयांना टक्कर देण्याचा विडाच जणू उचलला आहे. त्यामुळे आता ते बारामती लोकसभा मतदारसंघातील बारामती, दौंड, इंदापूर या भागाचे दौरे करत आहेत. याभागतील दौरे करून शिवसेना वाढवण्यासाठी प्रयत्न करताना पहायला मिळत आहेत. शिवतारे यांचा पुरंदरमध्ये हा फॉर्मुला सध्या फ्लॉप ठरत असला, तरी बारामती दौंड, इंदापूर आणि भोर तालुक्यातील लोकांना शिवतारे यांच्या बद्दल आकर्षण असल्याचे वातावरण तरी निर्माण होत असल्याचे पहायला मिळत आहे. शिवतरे यांची बोलण्याची पद्धत आणि बेधडक भिडण्याची सवय यामुळे पवार विरोधक शिवतारे यांच्या भोवती पहायला मिळत आहे.

### अजितदादांना शिवतारेंची जणू ऑफरच....

**» इंदापूर दौऱ्यावर असताना विजय शिवतारे यांनी केलेली अजित पवार यांची स्तुती, अजित पवार हे चांगले काम करणारा नेता असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. त्यातच अजित पवार यांची त्यांच्याच पक्षात घुसमट होत असल्याचे देखील त्यांनी सांगितले. त्यामुळे अजित पवार यांनी शिंदे यांच्या सेनेसोबत यावे अशी ऑफरच शिवतारे यांनी दिली आहे. त्यामुळे अजित पवार यांची स्तुती सुमने म्हंजे शिवतारे पुरंदरची साखर पेरणी असल्याचे बोलले जात आहे.**

# गुलाबराव पाटील कुठल्या पक्षाचे अध्यक्ष आहेत?

## गुलाबराव पाटलांना सुप्रिया सुळेंचा टोलाः शिंदे-भाजप सरकारमधील नेत्यांच्या वक्तव्यांनी चर्चांना उधाण

**।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**शिंदे गटाचे नेते व मंत्री गुलाबराव पाटील हे त्यांच्या रोखठोक व हटके वक्तव्यामुळे नेहमीच चर्चेत असतात. आता त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि विरोधी पक्षनेते अजित पवारांच्या भाजप शिवसेना युतीत येणार असल्याच्या चर्चांवर मोठं विधान केलं आहे. पाटील म्हणाले, "अजित पवार हीच राष्ट्रवादी आहे. त्यामुळे ते जे बोलतील तोच आमदारांचा आकडा त्यांच्यासोबत असेल.**



**अजित पवारांसोबत बरेच आमदार असून कोणतेही लग्न व्हायचं असेल तर तिथीची गरज असते.**

दरम्यान, संजय राऊत यांनीही राष्ट्रवादी फोडण्याचा भाजपचा डाव असल्याचे विधान केले होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडण्याची चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर खासदार सुप्रिया सुळे (SUPRIYA SULE) यांनी मंत्री गुलाबराव पाटील यांचा चांगलाच समाचार घेतला आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, "गुलाबराव पाटील हे कुठल्या पक्षाचे अध्यक्ष आहेत. ते एखाद्या पक्षाचे अध्यक्ष असतील तर मला माहीत नाही. माझे जनरल नॉलेज कमी असेल. मी अजितदादांशी विविध कामांसाठी दररोज बोलतेय. आज मी मतदार संघात काम करण्यासाठी आले आहे. गॉसिप करण्यासाठी नाही. त्यासाठी मला वेळ नाही."

दरम्यान, गुलाबराव पाटील यांनी महाविकास आघाडीच्या वज्रमूठ सभांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अजित पवार आपल्या १५ आमदारांना घेऊन भाजपमध्ये जाणार आहेत. त्यामुळे नागपूरमध्येही महाविकास आघाडीची वज्रमूठ सभा होणार असून ही सभा वज्रमूठ आहे की फुटलेली मूठ हे दिसेल अशी टीका मंत्री गुलाबराव पाटलांनी केली आहे. गुलाबराव पाटलांच्या या वक्तव्यावर मात्र विरोध पक्षनेते अजित पवार (AJIT PAWAR) यांनी आपल्या मिश्किल भाषेत उत्तर दिले आहे.

### आमचे हे सगळे आधीच ठरलेले आहे



**» अजित पवार म्हणाले की, "सर्व नेत्यांचे प्रेम माझ्यावरच का उतू जातेय, हेच मला कळत नाही. गुलाबराव पाटील, दादाजी भुसे, उदय सामंत हे आधी बोललेत. या सगळ्यांचा माझ्याबद्दलचे प्रेम का उतू जाताय हे कळायला मार्ग नाही. माझ्या बाबतची भूमिका मी मांडली आहे. या सभेला अजित पवार येणार की नाही, भाषण करणार की नाही, कुठे बसणार या चर्चा माध्यमांवर सुरू आहे. पण आमचे हे सगळे आधीच ठरलेले आहे."**

# हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोला गती!

## ‘प्लॅटफॉर्म पिअर आर्म’ उभारला : ‘आयटी हब’ची कनेक्टिव्हीटी वाढणार

।पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गावर मेट्रो स्थानक उभारणीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. या मार्गावरील पहिल्या मेट्रो स्थानकाचे काम ‘यशदा’समोर सुरू करण्यात आले. या मेट्रो स्टेशनसाठी लागणारा ‘प्लॅटफॉर्म पिअर आर्म’ (पीपीए) उभारण्यात आला आहे.**



हिंजवडीच्या आयटी हबला शिवाजीनगरच्या मध्यवर्ती केंद्राशी जोडणाऱ्या ‘पुणे मेट्रो लाइन ३’ प्रकल्पाच्या कामाला अनेक विभागांमध्ये गती मिळालेली आहे. आतापर्यंत या मार्गावर ४४० खांब उभारण्यात आले आहेत.

या मार्गावर एकूण ९०० खांब उभारले जाणार असून, त्यापैकी ५० टक्के काम पूर्ण झाले आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावरील मेट्रोची एकूण २३ स्थानके उभारली जाणार आहेत. प्रत्येक मेट्रो स्थानकासाठीच्या खांबाला ‘कॉनकॉर्स’ आणि प्लॅटफॉर्म विस्तारासाठी प्रत्येकी दोन ‘पीपीए आर्म’ जोडले जाणार आहेत. त्यानुसार ‘यशदा’समोरील मेट्रो स्टेशन क्रमांक १८च्या कामाला सुरुवात झाली आहे.

### ‘प्लॅटफॉर्म पिअर आर्म’ म्हणजे काय?

‘प्लॅटफॉर्म पिअर आर्म’ (पीपीए) हा मेट्रो स्टेशन उभरणीतील एक अत्यंत महत्वपूर्ण ‘स्ट्रक्चरल’ घटक असतो. मेट्रो स्थानकाचा डोलारा सांभाळणाऱ्या खांबाला दोन्ही बाजूंनी झाडाच्या फांद्यांसारखे हे ‘पीपीए’ जोडले जातात. त्यावर पुढे उभारण्यात येणारा मेट्रो स्थानकाचा पूर्ण प्लॅटफॉर्म तोलून धरला जाणार असतो. समोरून पाहिल्यास याचा आकार शरीरापासून लांब पसरलेल्या दोन्ही हातासारखा दिसतो, म्हणून याला प्लॅटफॉर्म पिअर आर्म (प्लॅटफॉर्मसाठीच्या खांबांचे हात) असे म्हटले जाते.

### ‘पुणे मेट्रो लाइन ३’ची माहिती

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), टाटा समूहाच्या ट्रिल अर्बन ट्रान्सपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड आणि सिमेन्स प्रोजेक्ट व्हेंचर्स यांच्या मार्फत प्रकल्प तयार करण्यता येत आहे. पुणे आयटीसिटी मेट्रो रेल लिमिटेड कंपनीला हा प्रकल्प ३५ वर्षांच्या कालावधीसाठी विकसित आणि ऑपरेट करण्यासाठी दिला जाणार आहे.

# करसंकलन विभागाकडून पैशाची उधळपट्टी?

## सोसायटी फेडरेशनचा विरोध : बील वाटपासाठी अनावश्यक खर्च कशाला?

।पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील मालमत्ता धारकांना मालमत्ता कराची बिले घरपोच वाटण्यासाठी महापालिकेकडून 90 लाख रुपयांचा खर्च केला जाणार आहे. त्यापेक्षा महापालिकेच्या कर संकलन विभागातील कर्मचाऱ्यांकडून प्रसंगी इतर विभागातील कर्मचाऱ्यांकडून ही बिले वाटप करावीत, आणि पैशांची उधळपट्टी थांबवावी, अशी मागणी चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनकडून करण्यात आली आहे.**





फेडरेशनच्या वतीने याबाबत निवेदन देण्यात आले आहे. बचत गटाच्या महिलांकडून पालिकेच्या हद्दीतील मालमत्ता धारकांना त्यांची मालमत्ता कराची बिले दिली जाणार आहेत. प्रत्येक बिलासाठी बचत गटाला 15 रुपये दिले जाणार आहेत.


शहरातील एकूण मालमत्ता धारकांना बिले वाटप करण्यासाठी 90 लाख रुपयांचा खर्च केला जाणार आहे. मागील वर्षी मालमत्ता कराची बिले शहरातील सर्व मालमत्ताधारकांना पोस्टाने पाठवण्यासाठी 48 लाख रुपये खर्च करण्यात आला होता. त्यातूनही महापालिकेला मालमत्ता बिले सर्वांना घरपोच पाठविण्याचे उद्दिष्ट साध्य करता आलेले नाही.

दिलेला पत्ता न सापडणे, पत्त्यावर कोणीही न भेटणे अशा अनेक कारणांमुळे नागरिकांचे 48 लाख रुपये व्यर्थ गेले. यावर्षी देखील मालमत्ता कराची बिले वाटपासाठी 90 लाख रुपयांना मान्यता देण्यात आली आहे. यातून सर्वसामान्य नागरिकांच्या पैशांची उधळपट्टी केली जात आहे. (PIMPRI) महापालिकेकडे मुबलक मनुष्यबळ असून त्यांच्याकडून हे काम करून घ्यावे. कर संकलन विभागातील कर्मचाऱ्यांकडून बिलांचे वाटप करावे. प्रसंगी इतर विभागातील कर्मचाऱ्यांकडून काम करून घ्यावे, असे फेडरेशन कडून देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

### फेडरेशनच्या वतीने निवेदन

फेडरेशनच्या वतीने याबाबत निवेदन देण्यात आले आहे. बचत गटाच्या महिलांकडून पालिकेच्या हद्दीतील मालमत्ता धारकांना त्यांची मालमत्ता कराची बिले दिली जाणार आहेत. प्रत्येक बिलासाठी बचत गटाला 15 रुपये दिले जाणार आहेत. शहरातील एकूण मालमत्ता धारकांना बिले वाटप करण्यासाठी 90 लाख रुपयांचा खर्च केला जाणार आहे. मागील वर्षी मालमत्ता कराची बिले शहरातील सर्व मालमत्ताधारकांना पोस्टाने पाठवण्यासाठी 48 लाख रुपये खर्च करण्यात आला होता. त्यातूनही महापालिकेला मालमत्ता बिले सर्वांना घरपोच पाठविण्याचे उद्दिष्ट साध्य करता आलेले नाही.

> पिंपरी चिंचवड महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह हे मालमत्ताकराच्या एक हजार कोटीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नागरिकांच्या पैशाची उधळपट्टी करत आहेत. सोसायट्यांना ग्रीन सोसायटी अंतर्गत मालमत्ताकरात सवलत देण्यासाठी महापालिका 60 लाख रुपये सूट देते. तर मालमत्ता बिलाचे वितरण करण्यासाठी 90 लाख रुपये खर्च करते. मालमत्ता कराची बिले पालिका कर्मचाऱ्यांकडून वाटप करावीत आणि नागरिकांच्या कररुपी पैशांची उधळपट्टी थांबवावी.
>
> - संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशन.



## संपादकीय »

# आनंदामागील 'अर्थ'!

***जागतिक अर्थव्यवस्थेचा गेल्या ३० वर्षांतील नीचांकी वेग यंदा नोंदला जाणार असेल तर त्यातून केवळ भारत वाचेल असे मानणे किंवा 'सर्वात वेगाने' वाढ म्हणून समाधानी होणे भाबडेपणाचेच..***

भारतीय अर्थव्यवस्था मंदावणार आणि भारत ही जगात सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरणार या 'आंतरराष्ट्रीय नाणेनिधी'ने एकाच दिवशी केलेल्या दोन विरोधाभासी आणि तरी संपूर्ण सत्य विधानांतील कोणते आपल्याकडे निवडले जाईल हे शेंबडे शाळकरी पोरदेखील सांगेल. जागतिक अर्थव्यवस्थेचा आढावा घेणारा नाणेनिधीचा अहवाल मंगळवारी प्रसृत झाला. त्यात भारताच्या अर्थगतीवर भाष्य असून पहिल्यांदाच आपला अर्थविकास सहा टक्क्यांची पातळीही गाठू शकणार नाही, असे म्हटले आहे. आपल्या अर्थगतीस देण्यात आलेले हे आजवरचे नीचांकी गुण! केंद्रीय आर्थिक पाहणीनुसार आगामी काळात आपला अर्थविकास वेग ६.५ टक्के असणे अपेक्षित आहे, आशियाई विकास बँक आणि आपलीच रिझर्व्ह बँक तो ६.४ टक्के असेल असे म्हणते, जागतिक बँकेच्या मते तो ६.३ टक्के इतका राहील, 'स्टँडर्ड अँड पुअर'ही आंतरराष्ट्रीय आणि 'इक्रा' ही राष्ट्रीय पतमानांकन संस्था तो आणखी खाली ६ टक्क्यांवर आणते तर 'ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक कोऑपरेशन अँड डेव्हलपमेंट' म्हणजे 'ओईसीडी' या संघटनेच्या मते मात्र भारत जेमतेम ५.९ टक्के इतक्याच गतीने वाढू शकेल. याचा अर्थ बलाढ्य देशांची 'ओईसीडी' आणि नाणेनिधी या दोन्ही संघटनांचे भारत ६ टक्के विकास दर गाठू शकणार नाही यावर एकमत दिसते. याचा साधा अर्थ असा की २०१३-१४ नंतर भारताच्या अर्थविकासाची गाडी जी रुळावरून घसरली ती अद्यापही परत मार्गावर येण्याची चिन्हे नाहीत. तथापि या वास्तवाकडे दुर्लक्ष करून आपण अजूनही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था कसे आहोत याबद्दल केंद्र पातळीवर बडवल्या जाणाऱ्या नगाऱ्यांपासून स्थानिक पातळीवरील चिरक्या पिपाण्यांचाही जल्लोष सुरू असला तरी विरोधाभासाचा अर्थ लावणे आवश्यक ठरते.याचे कारण आपण सहा टक्क्यांपेक्षाही खाली आलो असलो तरीही भारत जगातील सर्वात वेगवान अर्थव्यवस्था ठरतो हे विधानही तितकेच खरे आहे. याबाबत आपला प्रतिस्पर्धी आहे तो चीन. त्या देशाच्या अर्थविकासाची गती ५.२ टक्के असेल असे नाणेनिधीचे मत. यात लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे नाणेनिधीच्या तज्ज्ञ पथकाने चीनबाबत वर्तवलेल्या अंदाजात भारताप्रमाणे बदल केलेला नाही.

# ' रात्रीस खेळ चाले ...'





पारस मधील बाबूजी महाराज अंगात येण्याचा आणि मानसिक रुग्णांवर अघोरी उपचार करण्याच्या नादात सात निरपराध भाविकांना आपल्या जीवास मुकावे लागले. आताच्या आधुनिक काळातही असल्या अवैज्ञानिक प्रकारांवर लोक विश्वास ठेवतात आणि संस्थानचे कर्तेधर्ते त्याचा व्यावसायिक म्हणून वापर करून आपल्या तुंबड्या भरीत असतील आणि एवढी वर्ष गावकरी सुद्धा हे सगळे मुकाटपणे सहन करीत असतील तर या गावातील भावी पिढ्या कोणत्याही सजग नागरिकाला माफ करतील असे वाटत नाही. पारस अलीकडे काही गाव राहिले नाही , औष्णिक केंद्राच्या रूपाने इथे असणारा उच्चशिक्षित कर्मचारी,अधिकारी वर्ग एका बाजूला आधुनिक कॉलनीत राहतो आणि त्याच गावात परंपरांना शरण जाण्याची मानसिकता असणारा समाजही वास्तव्य करतो. एकाच गावात आधुनिक आणि परंपरावादी लोकांचा समूह असणारे पारस हे गाव आणि शहराच्या मध्ये आलेले नगर आहे.

बाबूजी महाराज याना शेकडो वर्षांपासून कदाचित असंख्य लोक मानत असतील ,अनेकांना या दैवतांबाबत आदरही असू शकेल ,मलाही तो आहेच. प्रत्येकाला आपल्या धार्मिक परंपरा,आस्था जपण्याचा अधिकार घटनेने दिला आहे मात्र हे करताना वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रसार करण्याची जबाबदारी सुद्धा राज्य घटनेने प्रत्येक नागरिकांवर टाकलेली आहे. ज्यांना याची कल्पना नसेल त्यांनी घटनेचे कलम ५१ [अ ] नजरेखालून घालावे. याच मंदिरात चालणारा अंधश्रद्धेचा जीवघेणा खेळ तत्काळ बंद होऊन इथे येणाऱ्या मानसिक रुग्ण किंवा इतरांना आवश्यक आरोग्य विषयक सुविधा ,सल्ला देण्याची व्यवस्था होणे यासाठी आता गावातील सुज्ञ नागरिकांनी पुढे यायला हवे. एखाद्या संस्थान मधील चुकीच्या प्रकारांवर टीका होत असेल तर ती आपल्या दैवतावरील टीका आहे असे ज्यांना वाटते त्यांनी किंवा देवाची बदनामी वाटते त्यांनी खरोखर देवाची बदनामी भाविक म्हणून आपण करीत आहोत की पत्रकार ? यावर आत्मचिंतन करायला हवे.

ग्राम गीतेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी पन्नास वर्षा आधीच या प्रकारांवर अतिशय प्रभावी भाष्य करून ठेवले आहे. अघोरी उपचार आणि हा भुताखेतांचा दरबार चालविणाऱ्या आणि अंगात येण्याच्या ढोंगाचे लाजिरवाणे समर्थन करणाऱ्या संस्थानच्या समर्थकांनी गावातील भावी पिढ्या कश्याचा अभिमान बाळगणाऱ्या तयार करायच्या आहेत याचाही विचार या निमित्याने केला पाहिजे. पारस येथील कथित " दुख निवारण दरबाराचे " सत्य उजेडात आणल्यावर गावातील शेकडो सुबुद्ध नागरिकांनी संपर्क करून मला पाठबळ दिले. गावातला विषय असल्याने आम्हाला पुढे येऊन बोलता येत नाही मात्र आमचे या अंधश्रद्धेला अजिबात समर्थन नाही असे सर्वांनी ठामपणे सांगितले याचा अर्थ गावातील सुज्ञ आणि सुधारणावादी नागरिकांना हा " रात्रीचा खेळ आवडत नाही परंतु मांजरीच्या गळ्यात घंटा बांधावी कुणी ? या अडचणीला अपघाताने वाचा फोडली.

अनिष्ट प्रथा बंद कराया सेवकें झिजवावी काया ! बाळापूर तालुक्यातील पारस या गावातील बाबूजी महाराज संस्थान वर दर रविवारी चालणाऱ्या " रात्रीस खेळ चाले " हा भोळ्या लोकांच्या जीवावर उठणारा तमाशा कायमचा बंद करायचा असेल तर कुणी बाहेरून येणार नाही ,ज्याला स्वतःचे गाव आधुनिक वाटेवर नेण्याची आस आहे ,ज्याला भावी पिढ्या विवेकवादी आणि कर्तृत्वान घडवायच्या आहेत त्या गावकऱ्यांना पुढे यावे लागेल. बाबूजी महाराज यांचा वार्षिक उत्सव,इतर धार्मिक आयोजन यात हिरीरीने भाग घेणाऱ्या सेवकांना समाजाच्या भल्यासाठी त्यात बदल घडवून आणावे लागतील. राष्ट्रसंत म्हणतात

**आपापल्या भाविक जना ,भुलविती उत्सवादिकी नाना**
**अंधश्रद्धेने होय धिंगाणा ,ग्राम जीवनाचा !**

कदाचित या कर्मकांडाने काही ठराविक पंच प्यारे सुखी होत असतील ,मोजक्या लोकांचा फायदा होत असेल परंतु गावाची,समाजाची अपरिमित हानी होत असेल तर व्यापक जनहित स्वीकारून जीवघेण्या रूढी,परंपरांना तिलांजली दिली पाहिजे. याच साठी महात्मा फुले,संत सावता माळी ,शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले जीवन खर्ची घातले आहे. त्यांच्याशी जे कुणी आपला वैचारिक वारसा, नाते सांगत असतील त्यांनी तरी स्वतःहून हा खेळ बंद करण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकले पाहिजे.

# पाण्याचं खासगीकरण नको....



**मी जल म्हणजे माझे चक्र हे गतिशील जीवन घटक आहे. मी सदैव पृथ्वीवर प्राण्यांमध्ये, माणसांमध्ये फिरतो. तुम्ही मला पृथ्वीच्या वर पाहू शकता. तुम्ही माझ्यापैकी बहुतेकांना पाहू शकत नाही. तुम्ही मला न पाहता अनुभवू शकता.**

माझ्यावर प्रेम आणि आदर केल्यानेच हे शक्य आहे. तू मला प्यायला लावतोस, घाम गाळतोस, मुळापासून झाडांच्या पानांपर्यंत पोचतोस आणि मला माझ्या शक्तीचा अनुभव देतोस. मला बाष्पोत्सर्जन आणि भूमिगत प्रवाहात देखील पाहिले जाऊ शकते.

माझे स्थान सर्व पृथ्वीवर सारखेच आहे. समुद्राची पातळी राखण्यासारखे. पृथ्वीच्या वाढत्या ज्वरामुळे हवामानाचा मूड बिघडल्याने पावसाचे चक्र बदलले आहे, परंतु मी हवामान आहे आणि मी हवामान आणि तापाचा मूड देखील दुरुस्त करतो. म्हणूनच मी हवामान संतुलित ठेवतो. माझा राग पृथ्वीवर फक्त पूर, दुष्काळ आणि वादळे आणतो.

मी आहे पृथ्वी, निसर्ग आणि मानवतेला न्याय देणारा म्हणूनच मी पृथ्वीच्या टोकापर्यंत पोहोचतो. सभ्यतेला जन्म देणारा आणि नष्ट करणारा मीच आहे. माझी विशालता आणि सर्वव्यापी मी फक्त जल-स्त्री-नदीच्या रूपात आहे. सभ्यता आणि संस्कृती निर्माण करते आणि वाढवते. वातावरणात बाष्प बनून अनेक शेकडो किलोमीटर मी रोज फिरतो.

मी पृथ्वीच्या पृष्ठभागावर दिवसातून दहा मैल चालतो. मी ध्रुवीय प्रदेशातील हिमनद्यांच्या (हिमनद) बर्फापासून फक्त काही मीटर चालतो. समुद्रात राहून मी प्रत्येक क्षणी वाटचाल करत राहते.

मला हवेचा व्यवहार आणि चालणाऱ्या जैविक प्रक्रिया समजतात. उष्णता सहन करण्याची आणि शोषण्याची अफाट शक्ती मी माझ्यात ठेवतो. त्याचे चक्र चालवणारा मीच आहे. मी टंचाईतून विपुलतेकडे जातो. मग एकाग्रतेने मला वेगळे करता येईल.माझ्या पृष्ठभागावर देखील तणाव आहे. तरीही मी माझ्या जोडीदाराला हात पुढे करत पुढे जातो. मग मला - माझे 'कैपलैरी ॲक्शन'' म्हणा. मी जगतो, एक पात्र म्हणून बदलतो. मी स्वातंत्र्यात दवबिंदूसारखा झालो. मी पण बबल आहे.मी पण संगीत आहे. मी गंध आणि सुगंध बनून जगाला सुगंधित करत राहतो. मी माझ्या स्वतःच्या उर्जेने पानांच्या शिखरावर पोहोचतो. तरीही, ते नेहमी उतारावर वाहते. माझी सावली अंधारातही माझ्या गोष्टी सांगते. माझ्या औषधाचा वापर मला सकाळी उठल्याबरोबर ते पिण्याची आठवण करून देतो.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महाविकास आघाडीची वज्रमूठ!

## “सच्च्या समाजसेवकासमोर झुकावंच लागलं”, उद्धव ठाकरेंचा अमित शाहांवर हल्लाबोल

।नागपूर ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



**ज्येष्ठ निरूपणकार, पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना यंदाच्या ‘महाराष्ट्र भूषण’ पुरस्काराने गौरवण्यात आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आप्पासाहेब धर्माधिकारी यांना ‘महाराष्ट्र भूषण’ पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावर आता शिवसेना ( ठाकरे गट ) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाष्य करत अमित शाहांवर हल्लाबोल केला आहे. सत्तेची मस्ती डोक्यात गेलेला कोणीही असला तरी, सच्चा समाजसेवकासमोर झुकावंच लागते, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. उद्धव ठाकरे नागपुरातील ‘वज्रमूठ’ सभेत बोलत होते.**

नागपुरात महाविकास आघाडीची ‘वज्रमूठ’ सभा पार पडली. या सभेत उद्धव ठाकरे बोलत होते. “आप्पासाहेब धर्माधिकारी यांना ‘महाराष्ट्र भूषण’ पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. ही आनंद आणि अभिमानाची गोष्ट आहे. पण, हा पुरस्कार देणारे देशभर घराणेशाहीच्या विरोधात बोंबलत आहे. मात्र, त्यांना एका समाजसेवा करणाऱ्या घरण्याच्यासमोर झुकावं लागलं.

सत्तेची मस्ती डोक्यात गेलेला कोणीही असला, तरी समोर सच्चा समाजसेवक असल्यावर झुकावंच लागेल. हे महाराष्ट्राने आज संपूर्ण देशाला दाखवून दिलं आहे.”

### सत्तेची नशा पूर्ण देश उद्ध्वस्त करते

“धर्माधिकारी घराण्याची एक परंपरा असून, ते व्यसनमुक्तीचे काम करतात. दारू आणि अंमली पदार्थाचे व्यसन वाईट असते. तसेच, सत्तेची नशा सुद्धा असते. दारूचे व्यसन एक घर उद्ध्वस्त करते. तर, सत्तेची नशा पूर्ण देश उद्ध्वस्त करते, हे आपण भोगत आहोत,” असं टीकास्त्र उद्धव ठाकरेंनी मोदी सरकारवर केलं आहे.

> **“आपल्या देशात लोकशाहीचा उपयोग फक्त सत्तेत बसलेल्यांच्या मित्रांचे गिऱ्हाईक आणि मतदार वाढवण्यासाठी केला जातोय. जगाच्या श्रीमंतीत यांच्या मित्रांचे क्रमांक वाढत चालले आहेत. पण, गोरगरीब जनतेचा क्रमांक खाली चालला आहे,”**
>
> **-उद्धव ठाकरे**

---

# "कुछ तो मजबूरियां रही होंगी, यूं कोई बेवफ़ा नहीं होता..!

## जयंत पाटलांचा मुख्यमंत्र्यांना टोला : नागपूरमध्ये महाविकास आघाडीची वज्रमूठ सभा

। 'नागपूर।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

नागपूरमध्ये महाविकास आघाडीची 'वज्रमूठ' सभा होत आहे. या सभेमध्ये बोलताना जयंत पाटील यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर टीका केली. जयंत पाटील म्हणाले, पहिला सभा, ही छत्रपती संभाजीनगरमध्ये झाली. दुसरी सभा नागपुरमध्ये होत आहे. नागपूर हे भारताचे मध्य केंद्र आहे. इंदिरा गांधी यांना देशाच्या सर्वोच्च पदावर पोहोचण्यासाठी याच विदर्भाने साथ दिली. विदर्भाचा निर्णय देशात पोहोचतो, असेही जयंत पाटील म्हणाले.

विदर्भाने निर्णय केला की तो देशाचा निर्णय होतो. आमची वज्रमूठ



ही शेतकऱ्यांची आहे. या सरकारने विदर्भातील शेतकऱ्यांना काय दिले. कोणते नवीन प्रकल्प आणले. विदर्भासाठी कोणते निर्णय घेतले जणे करुन नागरिकांना वाटेल की आपला नेता या सरकारमध्ये काम करतो, असा हल्लाबोल जयंत पाटील यांनी केला. या सरकारने महाराष्ट्राला सुडाचे राजकारण दिले. मागच्या वर्षभरात राज्यात सुडाचे राजकारण सुरु आहे. सत्तेत आल्या-आल्या अजित पवार यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पातील सर्व कामांना स्थगिती दिली. आम्ही न्यायालयात गेलो तरी सुद्धा सरकारने कामांवरील स्थगिती उठवली नाही. प्रकल्प गेले तर त्या उद्योग पतींकडे जाण्याचे धाडस मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना झाले नाही, असा टोला पाटील यांनी लगावला.

### महाराष्ट्रातील शिवसैनीक उद्धव ठाकरे यांच्यासोबत

**कुछ तो मजबुरीया रही होगी. युव तो कोई बेईमान नही होता, काहीतरी नस दाबली असेल, असे म्हणत पाटील यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना टोला लगावला. सर्व महाराष्ट्रातील शिवसैनीक उद्धव ठाकरे यांच्यासोबत आहे. नऊ वर्ष केंद्रात सरकार आहे. आमचा देश अध्यक्ष महोदय, असे जयंत पाटील म्हणाले त्यावर एकच हशा पिकला. देशाची अधोगती झाली आहे. देशात विरोधकांना शत्रू मानण्याचे काम सुरु झाले आहे. आपण सगळ्यांनी ही वज्रमूठ एकत्रीत केली पाहिजे. नागपुरात एक तास पाणी मिळते. नागपुरचा विकास होत नसेल तर महाराष्ट्राचा विकास कसा होईल, असा सवाल त्यांनी केला. आमच्या वज्रमुठीला नाव ठेवतात. त्यांना याची भिती आहे की हे एकत्र राहिले तर आपल्याला सत्ता मिळणार नाही, त्यामुळे ते म्हणतात वज्रमुठीला तडा गेला आहे, असे पाटील म्हणाले.**

---

# राज्याच्या राजकारणात १५ दिवसात दोन मोठे भूकंप होणार

## प्रकाश आंबेडकरांच्या वक्तव्यानं राजकीय वर्तुळात खळबळ

**पुणे** : महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत आणि इतर प्रकरणांची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पूर्ण झाली असून निकालाची प्रतीक्षा आहे. दुसरीकडे तसेच महाविकास आघाडीमध्ये विविध मुद्यांवरुन विसंगती आढळून आली होती. आज काही माध्यमांनी अजित पवार यांच्यासह ४० ते ४५ आमदारांचा गट बाहेर पडणार असल्याच्या बातम्या दिल्या आहेत. राज्याच्या राजकारणात कधी काही स्फोट होईल हे कोणी सांगू शकत नाही.



राज्यात सुरु असलेल्या राजकीय घडामोडी पाहता वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकरांनी एक मोठं विधान केले आहे. " येत्या १५ दिवसात महाराष्ट्रात मोठ राजकारण होईल म्हणून आपण १५ दिवस वाट पाहूया, १५ दिवसात राज्याच्या राजकारणात दोन मोठे बॉम्बस्फोट होतील" असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे.

### महाविकास आघाडीच्या वज्रमूठीबाबत मोठं भाकीत

**पुण्यात बा भीमा या पुस्तक प्रकाशना साठी ते आले होते. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. महाविकास आघाडीच्या वज्रमूठीबाबत त्यांनी मोठं भाकीत केलं आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात खळबळ वाजली आहे, नेमकं मोठं राजकारण काय होईल. याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. राज्याच्या राजकारणात नेमकं काय होणार आहे ? याची कल्पना अजून कोणालाच नाही.. म्हणून येणाऱ्या दिवसात हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.**

# भाजपाला धक्क्यावर धक्के!

## माजी मुख्यमंत्री, लिंगायत नेते जगदीश शेट्टर यांचा राजीनामा, काँग्रेसच्या आशा पल्लवीत

**| बंगळुरू | महाईन्यूज |**

**कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपाचे नेते जगदीश शेट्टर यांनी आज (दि. १६ एप्रिल) आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला. गेल्या काही दिवसांपासून भाजपामध्ये मोठी नाराजी पाहायला मिळत आहे. अनेक ज्येष्ठ नेत्यांचे तिकीट यावेळी दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी कापले. त्यामुळे नाराज नेते पक्षाला आव्हान देण्याचा प्रयत्न करत आहेत. तरीही या दबावाला बळी न पडण्याचा निर्धार दिल्लीश्वरांनी केला. कर्नाटकमध्ये १० मे रोजी विधानसभेचे मतदान होणार आहे. हुबळी-धारवाड मध्य मतदारसंघाचे आमदार असलेल्या शेट्टर यांना तिकीट नाकारल्यानंतर त्यांनी आज सकाळी विधानसभा अध्यक्ष विश्वेश्वर हेगडे यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला. दोन दिवसांपूर्वीच भाजपाचे नेते, माजी उपमुख्यमंत्री लक्ष्मण सवदी यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देत काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता.**

### कोण आहेत जगदीश शेट्टर?

कर्नाटकच्या बागलकोट जिल्ह्यामध्ये बदामी तालुक्यातील केरुर या गावी १९५५ रोजी जन्मलेल्या शेट्टर यांनी २०१२ ते २०१३ पर्यंत कर्नाटकचे १५ वे मुख्यमंत्री म्हणून कार्यभार सांभाळला होता. सहा वेळा आमदार असलेले शेट्टर लिंगायत समाजातील मातब्बर नेते म्हणून ओळखले जातात. काँग्रेसचे नेते सिद्धरामय्या मुख्यमंत्री असताना २०१४ ते २०१८ या काळात शेट्टर यांनी विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणूनही काम पाहिले. तसेच २००८-०९ या काळात विधानसभेचे अध्यक्षपद भूषविले. बीएस येडियुरप्पा यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात शेट्टर यांनी विविध मंत्रिपदे भोगली. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक-राजकीय कार्याला सुरूवात केली होती. १९९४ रोजी ते पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. त्यावेळी हुबळी ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून त्यांना १६ हजारांचे मताधिक्य मिळाले होते. त्यानंतर सलग दोन वेळा याच मतदारसंघातून त्यांनी विजय प्राप्त केला. १९९९ आणि २००४ च्या निवडणुकीत त्यांना अनुक्रमे २५ हजार आणि २६ हजारांचे मताधिक्य मिळाले. २००८ साली त्यांनी हुबळी-धारवाड मध्य मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास सुरुवात केली. शेट्टर यांनी महसूल मंत्री, ग्रामविकास आणि पंचायत राज मंत्री म्हणून कार्यभार सांभाळलेला आहे.




### शेट्टर यांना प्रामाणिक मुख्यमंत्र्यांची उपाधी

» शेट्टर हे लिंगायत समाजाचे मोठे नेते आहेतच, त्याशिवाय ते बीएस येडियुरप्पा यांचे निकवर्तीय समजले जातात. शेट्टर यांनी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतल्यास हुबळी प्रातांत भाजपासमोर कडवे आव्हान निर्माण होऊ शकते. जसे प्रल्हाद जोशी आणि विद्यमान मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या दरम्यान निर्माण झाले आहे.दरम्यान शेट्टर यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करावा, यासाठी काँग्रेसचे नेते प्रयत्नशील आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बीके हरिप्रसाद यांनी म्हटले की, जर शेट्टर काँग्रेस पक्षात प्रवेश करत असतील तर त्यांचे स्वागत केले जाईल. यासाठी त्यांनी शेट्टर यांना प्रामाणिक मुख्यमंत्री अशी उपाधीही देऊन टाकली. त्यांच्या काळात कर्नाटकात एकही भ्रष्टाचार झाला नाही, असेही हरिप्रसाद यावेळी म्हणाले.

### तर भाजपाला निवडणुकीत 20 ते 25 जागांचे नुकसान

**» विधी पदवीधर असलेले शेट्टर यांनी २० वर्ष वकिली केली. कोणत्याही परिस्थितीत यावेळी विधानसभा निवडणूक लढविणारच, अशी घोषणा काही दिवसांपूर्वीच त्यांनी केली होती. उमेदवारी न दिल्यास त्यांनी बंडखोरीचा इशारा दिला होता. जर त्यांना हुबळी-धारवाड मध्य मतदारसंघातून उमेदवारी मिळाली नाही, तर भाजपाला निवडणुकीत २० ते २५ जागांचे नुकसान होईल, असे विधान त्यांनी केले होते. शेट्टर यांनी ११ एप्रिल रोजी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले, "माझे तिकीट कापल्यामुळे मी नाराज आहे. मी पक्ष उभा करण्यासाठी माझ्या आयुष्यातील ३० हून अधिक वर्ष दिली. जर पक्षाने मला दोन ते तीन महिन्याअगोदर कल्पना दिली असती तर मी हा निर्णय स्वीकारला असता. पण उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अवघे काही दिवस उरले असताना मला निवडणूक न लढविण्यास सांगितले जात आहे. पण मी माझ्या मतदारसंघात अगोदरच प्रचाराला सुरुवात केली आहे."**

---

# अरविंद केजरीवालांची सीबीआय चौकशी सुरूच!

## आपच्या नेत्यांनी बोलावली आपत्कालीन बैठक, कार्यकर्त्यांची सीबीआय कार्यालयाजवळ निदर्शने

**| नवी दिल्ली | महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**मद्यविक्री धोरण गैरव्यवहारप्रकरणी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची चौकशी सुरू केली आहे. दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया याप्रकरणी आधीच तुरुंगात आहेत. आता अरविंद केजरीवाल यांचीही चौकशी सुरू केल्याने आपच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला आहे. देशभर विविध ठिकाणी या चौकशीविरोधात कार्यकर्त्यांकडून आंदोलने केली जात आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर पुढील रणनीती आखण्याकरता आम आदमी पक्षातील वरिष्ठ नेत्यांची आपत्कालीन बैठक बोलावण्यात आली आहे. मनीष सिसोदियांप्रमाणेच अरविंद केजरीवाल यांनाही अटक होऊ शकते, अशी भीती आपच्या नेत्यांनी वर्तवली आहे.**



आपचे संयोजक गोपाल राय यांनी ट्वीट करत या आपत्कालीन बैठकीची माहिती दिली. या बैठकीला आपचे राष्ट्रीय सचिव पंकज गुप्ता, महापौर शेली ऑबेरॉय आणि उपमहापौर आले इक्बाल उपस्थित आहेत.

"सीबीआय मुख्यालयाजवळ शांतीपूर्वक आंदोलन करणाऱ्या कॅबिनेट मंत्री आणि खासदारांना अचानक ताब्यात का घेतलं गेलं? मोदी लोकशाहीची हत्या करण्यासाठी का उतरले आहेत? पुढील रणनीती आखण्याकरता पक्षाच्या मुख्यालयात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात आली आहे", असं ट्वीट गोपाल राय यांनी केलं.

आज सकाळपासूनच अरविंद केजरीवाल यांची सीबीआय चौकशी सुरू आहे. सीबीआयच्या दिल्लीतील मुख्य कार्यालयाबाहेर आपच्या कार्यकर्त्यांनी घेराव घातला आहे. पोलिसांकडून या कार्यकर्त्यांची धरपकड सुरू आहे. राघव चढ्ढा,संजय सिंह यांच्यासह आम आदमी पक्षाचे अनेक नेते आणि कार्यकर्त्यांनी सीबीआय कार्यालयाजवळ निदर्शने केली. त्यामुळे पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आहे.

### भाजपाला केजरीवाल यांची भीती वाटतेय

**» "भाजपाला केजरीवाल यांची भीती वाटतेय. पण आम्ही तुरुंगाला घाबरत नाही. केजरीवालांची भीती वाटत असल्यानेच भाजपाला अशा कारवाया कराव्या लागत आहेत", अशी प्रतिक्रिया आपचे नेते राघव चढ्ढा यांनी दिली. सीबीआयच्या चौकशीला जाण्याआधी अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीतील राजघाट येथे जाऊन महात्मा गांधी यांना अभिवादन केले. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, आपचे खासदार संजय सिंग यांच्यासह आपचे अनेक वरिष्ठ नेते अरविंद केजरीवाल यांच्यासोबत गेले आहेत.**

# राजस्थानच्या नंदिनी गुप्ताने अवघ्या 19 व्या वर्षी पटकावला मिस इंडिया 2023 चा किताब

फेमिना मिस इंडिया 2023 ची घोषणा झाली आहे. राजस्थानच्या नंदिनी गुप्ताची मिस इंडिया २०२३ विजेती म्हणून निवड झाली. तर दिल्लीची श्रेया पुंजा ही पहिली उपविजेती ठरली. आणि मणिपूरच्या थौनाओजम स्ट्रेला लुवांगला द्वितीय उपविजेतेपद देण्यात आले. नंदिनी गुप्ता हिला मिस इंडिया 2022 ची विजेती सिनी शेट्टीने मुकूट घातला.

मिस इंडिया 2023 चा ग्रँड फिनाले इंफाळ, मणिपूर येथे झाला. यामध्ये अनन्या पांडे ते कार्तिक आर्यन, नेहा धुपिया अशा बॉलिवूड स्टार्सचा सहभाग होता. अखेर या स्पर्धेत नंदिनी गुप्ताने बाजी मारली आहे.१९ वर्षीय नंदिनी ही कोटा शहरातून आहे. आपल्या



सर्वांना ठाऊक आहे कि कोटा हे इंजिनियरिंग आणि वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्यांसाठी देशातील सर्वात मोठे कोचिंग हब आहे. ब्युटी विथ ब्रेन असणाऱ्या नंदिनीने बिझनेस मॅनेजमेंटमध्ये पदवी घेतली आहे. नंदिनी कायम नवनवीन आव्हाने स्वीकारून प्रगतीच्या मार्गावर जाण्यासाठी उत्सुक असलेली मुलगी आहे

नंदिनी गुप्ता हिने तिच्या सौंदर्याने आणि तिच्या बुद्धीमत्तेने तिने सर्वांची मनं जिंकली आहेत. तिने तिच्या उत्कृष्ट उत्तरांनी न्यायाधीशांचे मन जिंकले. तिची विनोदी शैली आणि हजरजबाबीपणा पाहिल्यानंतर सर्व न्यायाधीशांना तिचे कौतुक वाटू लागले.

फेमिना मिस इंडिया 2023 चा खिताब जिंकणारी 19 वर्षीय नंदिनी गुप्ता हिचा जन्म राजस्थानमध्ये झाला होता. त्याचबरोबर ती व्यवसायाने मॉडेल आहे. तिने बिझनेस मॅनेजमेंटची पदवी घेतली आहे.

# 'डिलाईल रोडचा 'तो' बसस्टॉप आणि आम्ही दोघं.. सोबतची खास आठवण

सध्या झी मराठी वाहिनीवरील 'तू चाल पुढं...' मालिकेत अश्विनी या मध्यवर्ती भूमिकेच्या माध्यमातून अभिनेत्री दीपा परबनं प्रेक्षकांच्या मनात घर केलं आहे. अनेक वर्षांच्या ब्रेकनंतर दीपानं पुन्हा मालिकेतनं पदार्पण केलं आहे.वयाच्या चाळीशीनंतर कमबॅक करताना नेमका काय फरक जाणवतो किंवा यानं अभिनेत्री म्हणून काम करताना फरक पडतो का यावर दीपानं थेट भाष्य केलं आहे. ईसकाळला दिलेल्या पॉडकास्ट मुलाखतीत दीपानं आपला नवरा अभिनेता अंकुश चौधरी सोबतच्या लव्हस्टोरीला उजाळा देताना लग्नाआधीच्या काही खास आठवणी देखील शेअर केल्या आहेत.

याच मुलाखतीत आपल्याला बायोपीकमध्ये काम करायची संधी मिळाली तर ती व्यक्तिरेखा कोणाची असेल यावर देखील दीपा परबनं खुलासा केला आहे. दीपा परबनं ईसकाळला दिलेल्या पॉडकास्ट मुलाखतीची



लिंक बातमीत जोडली आहे.याच ईसकाळ मुलाखतीत दीपानं तिच्या आणि अंकुशच्या लव्हस्टोरीविषयी ,त्यांच्यातील बॉन्डिंगविषयी काही खास गोष्टी शेअर केल्या आहेत. डिलाईल रोडच्या बसस्टॉपवरच्या काही रोमँटिक आठवणी शेअर करताना दीपानं दोघांमधील भांडणाचा तो बसस्टॉप कसा साक्षीदार आहे याविषयीचे काही किस्से शेअर केले आहेत.



# मृण्मयी देशपांडेचा 'तो' फोटो बघताच वैतागली गौतमी

मृण्मयी देशपांडे आणि गौतमी देशपांडे ही मराठी मनोरंजन सृष्टीतील बहीणींची लोकप्रिय जोडी. आपल्या मोठ्या बहिणीच्या पावलावर पाऊल टाकत गौतमीनेही कलाविश्वात तिचं स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. त्यांच्या कामाबरोबरच त्या दोघी त्यांच्यातल्या बॉंडिंगमुळे सर्वांचं लक्ष वेधून घेत असतात. एका फोटोवर गौतमीने केलेली कमेंट खूप चर्चेत आली आहे.गौतमी आणि मृण्मयी कायम एकमेकींचे गमतीशीर व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करत असतात. त्यात अनेकदा त्या एकमेकांशी भांडताना, एकमेकींच्या खोड्या काढतानाही दिसतात. तर आता मृण्मयीने पोस्ट केलेला एक फोटो पाहून गौतमी चांगलीच वैतागली आहे. मृण्मयी देशपांडे ही गेले अनेक महिन्यांपासून महाबळेश्वरला राहत आहे. तिथे त्यांनी घरही बांधलं आहे. तर कामानिमित्त तिचं मुंबई-पुण्याला येणं होतं. काही दिवसांपूर्वी ती कामानिमित्त मुंबईत आली होती आणि आता ती परत महाबळेश्वरला गेली आहे. महाबळेश्वरला पोहोचल्यानंतर मृण्मयीने तिचा एक सेल्फी पोस्ट केला आणि लिहिलं, "मी पोहोचले महाबळेश्वरला..." तिचा हा फोटो पाहून गौतमी मात्र रागावली. तिने लिहिलं, "ढाप अजून माझे कपडे आणि म्हण मी गेल्या दोन वर्षात एक नवीन कपडा घेतला नाही."आता मृण्मयीच्या या फोटोवर गौतमीने केलेली ही कमेंट चांगलीच चर्चेत आली आहे. तर या कमेंटला गौतमीच्या चाहत्यांनी विविध प्रतिक्रिया देत तिची बाजू घेतली आहे. पण अद्याप मृण्मयीने तिच्या हटके शैलीत गौतमीच्या या कमेंटला उत्तर दिलेलं नाही. यावर आता गौतमी कशी व्यक्त होते हे पाहण्यासाठी सर्वजण उत्सुक झाले आहेत.

# 'घर बंदूक बिरयानी'च्या टीमने प्रेक्षकांना दिली खास भेट

दिग्दर्शक नागराज मंजुळे आज मनोरंजन सृष्टीतील आघाडीचे दिग्दर्शक म्हणून ओळखले जातात. त्यांचा चाहतावर्ग खूप मोठा आहे. त्यांच्या चित्रपटांकडे प्रेक्षकांचं नेहमीच लक्ष लागलेलं असतं. सध्या ते त्यांच्या 'घर बंदूक बिरयानी' या चित्रपटामुळे चर्चेत आहेत. गेल्याच आठवड्यात त्यांचा हा चित्रपट प्रदर्शित झाला. तर या चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. आता या चित्रपटाच्या टीमने प्रेक्षकांना एक खास भेट दिली आहे.

अभिनेता आकाश ठोसर आणि अभिनेत्री सोनाली पाटील यांची प्रमुख भूमिका असलेला 'घर बंदूक बिरयानी' हा चित्रपट प्रेक्षकांना चांगलाच आवडला आहे. याचबरोबर या चित्रपटात अभिनेते सयाजी शिंदे हटके भूमिकेत दिसत आहेत तर नागराज मंजुळे यांनी देखील या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आहे.

सर्व कलाकारांचा दमदार अभिनय, चित्रपटाची कथा प्रेक्षकांना खिळवून ठेवणारी आहे.कालच हा चित्रपट प्रदर्शित होऊन एक आठवडा झाला. तरी या निमित्त आज या चित्रपटाच्या टीमने चित्रपट पाहायला येणाऱ्या प्रेक्षकांना तिकिटामध्ये मोठी सवलत दिली आहे. आज म्हणजे शनिवारी हा चित्रपट प्रेक्षकांना फक्त १०० रुपयांत पाहता येणार आहे. आकाश ठोसर याने त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक स्टोरी पोस्ट करत ही बातमी चाहत्यांची शेअर केली.

आज या चित्रपटाच्या टीमने प्रेक्षकांना ही भेट देत आश्चर्याचा सुखद धक्का दिला आहे. या खास ऑफरमुळे प्रेक्षक खूश झाले आहेत. त्यामुळे आता किती प्रेक्षक ही भेट स्वीकारत आज हा चित्रपट पाहणार हे बघणं औत्सुक्याचं ठरेल.



# रजवाड्यांची रॉयल्स कामगिरी!

## राजस्थानचा गुजरातवर तीन गडी राखून सनसनाटी विजय

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**इंडियन प्रीमिअर लीगमधील डबल हेडरच्या दुसऱ्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने तीन गडी राखून गुजरात टायटन्सवर रोमांचक विजय मिळवला. हेटमायर हा विजयाचा शिल्पकार ठरला. रविवार क्रिकेट चाहत्यांसाठी खास ठरला. डबल हेडरमधील दोन्ही सामने हे अतिशय रोमांचक झाले. त्यातील दुसरा सामन्यात राजस्थान रॉयल्सने तीन गडी राखून गुजरात टायटन्सवर रोमांचक विजय मिळवला. हेटमायर हा विजयाचा शिल्पकार ठरला. गुजरात टायटन्सने २० षटकांत ७ गडी गमावून १७७ धावा केल्या. राजस्थानला विजयासाठी १७८ धावांचे लक्ष्य ठेवले होते ते राजस्थानने शेवटच्या षटकात ४ चेंडू आणि तीन गडी राखून पार केले.**




आयपीएल २०२३च्या रोमांचक सामन्यात राजस्थान रॉयल्सने गुजरात टायटन्सचा तीन गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना गुजरात टायटन्सने २० षटकांत ७ गडी गमावून १७७ धावा केल्या. प्रत्युत्तरात राजस्थान रॉयल्सने चार चेंडू राखून सामना जिंकला. राजस्थान रॉयल्सकडून कर्णधार संजू सॅमसनने सर्वाधिक ६० धावा केल्या. आणि शिमरॉन हेटमायर ५६ धावा करून नाबाद राहिला. गुजरातकडून मोहम्मद शमीने सर्वाधिक तीन बळी घेतले. त्यानंतर दोन विकेट्स राशिदने घेतल्या तर कर्णधार हार्दिक पांड्या आणि नूरला १-१ विकेट घेत यांना साथ दिली.

### हेटमायरची उत्कृष्ट फलंदाजी...

**कर्णधार संजू सॅमसन ३२ चेंडूत ६० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. संजूने आपल्या खेळीत ६ षटकार आणि ३ चौकार लगावले. ध्रुव जुरेल १८धावा करू शकला. यानंतर अश्विन झंझावाती खेळी खेळताना तीन चेंडूत १० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. हेटमायरने एका टोकाकडून फलंदाजी सुरू ठेवली आणि अखेरच्या षटकात षटकार मारून संघाला विजय मिळवून दिला.**

तत्पूर्वी, गुजरातने दिलेल्या १७८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सची सुरुवात खराब झाली. संघाने तीन षटकांत दोन्ही सलामीवीरांच्या विकेट्स गमावल्या.

दुसऱ्या षटकात एक धाव घेत यशस्वी जैस्वाल बाद झाली. यानंतर तिसऱ्याच षटकात जोस बटलर खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतला. देवदत्त पडिक्कल काही वेळ क्रीजवर राहिला आणि २५ चेंडूत २६ धावा करून बाद झाला. रियान पराग पुन्हा एकदा स्वस्तात पॅव्हेलियनमध्ये परतला. संजू सॅमसनने शिमरॉन हेटमायरसोबत पाचव्या विकेटसाठी ५० हून अधिक धावांची भागीदारी करून संघाला विजयाच्या जवळ पोहोचण्यास मदत केली.

---


# भाऊराया! स्विंगवर अर्जुन तेंडुलकरने फलंदाजाला चकवले

## बहीण सारा तेंडुलकर झाली भावूक, भावाला पाठिंबा देण्यासाठी स्टेडियममध्ये उपस्थित

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**कोलकाता नाईट रायडर्स विरुद्धच्या सामन्यात मुंबई इंडियन्सने अर्जुन तेंडुलकरला प्लेइंग-११ मध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेतल्याने आयपीएलच्या १६व्या हंगामातील २२वा सामना खूप खास बनला. २०२१ मध्ये मुंबई संघाचा भाग झाल्यानंतर, सर्व क्रिकेट चाहते अर्जुनच्या पदार्पणाची आतुरतेने वाट पाहत होते, त्यानंतर अखेरीस त्याला या हंगामात ही संधी देण्यात आली. यादरम्यान सारा तेंडुलकरही तिच्या भावाला पाठिंबा देण्यासाठी स्टेडियममध्ये उपस्थित होती.**

मुंबई इंडियन्सच्या या सामन्यात रोहित शर्माच्या अनुपस्थितीत कर्णधारपदाची धुरा सांभाळणाऱ्या सूर्यकुमार यादवने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर मुंबईकडून गोलंदाजी सुरू करण्याची जबाबदारी डावखुरा वेगवान गोलंदाज अर्जुनकडे सोपवण्यात आली. पहिल्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर अर्जुनने बॅट चुकवून आऊटसाठी जोरदार अपील केले पण पंचांनी ते नाकारले. यादरम्यान अर्जुनची गोलंदाजी पाहून साराची प्रतिक्रियाही सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे.



नियमित कर्णधार रोहित शर्माच्या अनुपस्थितीत सूर्यकुमार यादव याने मुंबईचे नेतृत्व केले. त्याचवेळी या सामन्यात भारताचा सर्वकालीन महान फलंदाज सचिन तेंडुलकर याचा मुलगा अर्जुन तेंडुलकर याने आयपीएल पदार्पण केले.

या सामन्यासाठी अर्जुनची बहिण सारा ही मैदानात उपस्थित होती. आपल्या भावाला पदार्पण करताना पाहून तिचे डोळे पाणावले. विशेष म्हणजे कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी पहिले षटक टाकण्याची जबाबदारी अर्जुनला दिली. अर्जुनने पहिला चेंडू टाकला त्यावेळी सारा हिच्या डोळ्याच्या कडा पाणवलेल्या दिसल्या.



साराने या सामन्यासाठी आपल्या मित्र-मैत्रिणींसह हजेरी लावली. अर्जुनने सामन्यातील पहिले षटक टाकताना केवळ पाच धावा दिल्या. त्यानंतर दुसऱ्या शतकात गोलंदाजीला आल्यावर व्यंकटेश अय्यर याने त्याला एक चौकार व एक षटकार खेचला.